# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


दिनांक 17/11/2023 (शुक्रवार) सकाळ

## अवैध रेती चोरी करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद
## पोलीस स्टेशन मौदाची कारवाई

पोस्टे मौदा अंतर्गत १४ किमी अंतरावर कुंभापुर ते खंडाळा रोड मौजा खंडाला शिवार मौदा येथे दिनांक १६/११/२०२३ चे १२.१० वा. दरम्यान पोलीस स्टेशन मौदा येथील स्टाफ हे पोलीस स्टेशन मौदा हद्दीत पेट्रोलींग करीत असतांना नमुद घटनास्थळी ट्रॅक्टर क्र. एम. एच.– ४०/बी जे –१३२७ चा चालक व मालक आरोपी नामे– अनिल वासुदेव आंबीलडुके, रा. कन्हान पारशिवनी कन्हान नागपुर हा कुंभापुर येथील नदीच्या पात्रातुन अवैधरीत्या रेती भरून कोणत्याही प्रकारची परमीशन न घेता चोरून वाहतुक करतांना मिळुन आल्याने आरोपीचे ताब्यातून निळया रंगाचा ट्रॅक्टर क्र. एम एच– ४०/ बी.जे– १३२४ व ट्रॅक्टर लागुन असलेली एक हिरव्या रंगाची नंबर नसलेली ट्रॅक्टरची ट्रॉली किंमती ५०००००/– रू व त्यामध्ये १ ब्रास गौण खनिज रेती किंमती ४०००/– रू. असा एकुण ५०४०००/– रूपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

सदर प्रकरणी सरतर्फे फिर्यादी नामे– पोशि विकास कालीदास मस्के पोस्टे मौदा जि. नागपुर यांचे रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि सहकलम ४८ (८) जमिन महसुल अधिनीयम १९६६ कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक श्री. उरकुडे मो. नं. ८३२९०४७५८८ हे करीत आहे.




पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर